# शहर सहकारीची वार्षिक सभा खेळीमेळीत



**अहमदनगर । रयत समाचार**

अहमदनगर शहर सहकारी बँकेची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. मागील दोन वर्षांच्या तुलनेत यंदा बँकेने उल्लेखनीय प्रगती केली असून, ग्रॉस एन.पी.ए. २२.२८ टक्क्यांवरून ३.२५ टक्क्यांवर आणि निव्वळ एन.पी.ए. १.२६ टक्क्यांवर आणण्यात बँकेला यश आले आहे.

वसुलीतील विशेष प्रयत्नांमुळे हे शक्य झाल्याचे चेअरमन सीए. गिरीश घैसास यांनी सभेसमोर मांडले. चेअरमन घैसास यांनी माजी आमदार स्व. अरुण जगताप यांचे बँकेशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध आणि केलेले सहकार्य आठवून श्रद्धांजली वाहिली. त्यांनी बँकेचे टिअर-१ कॅपिटल १९.७१ कोटींवर, नेटवर्थ १२.६० कोटींवर पोहोचल्याची माहिती दिली. युपीआय सुविधेचा मोठ्या प्रमाणावर वापर होऊन अहवाल वर्षात ४०४ कोटी रुपयांचे व्यवहार पार पडले.

बँकेचा सीडी रेशो ४६ टक्क्यांवरून ५६ टक्क्यांपर्यंत वाढला असून तो ७० टक्क्यांपर्यंत नेण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असे त्यांनी नमूद केले. सभासदांची दीर्घकालीन मागणी पूर्ण करत सिनीयर ऑफिसर दिनेश लोखंडे यांची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याचे घैसास यांनी सांगितले. क्लार्क पदावर नियुक्त झालेला कर्मचारी सीईओ पदापर्यंत पोहोचणे ही बँकेसाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वार्षिक अहवाल वाचून सर्व ठराव सभेसमोर ठेवण्यात आले आणि ते एकमुखाने मंजूर झाले.

सभासदांनी चर्चासत्रात सहभाग घेत संचालक मंडळाच्या कामकाजाचे कौतुक केले. सभासद रत्नाकर कुलकर्णी व इतरांनी पुढील वर्षापासून अहवाल छपाईऐवजी डिजिटल स्वरूपात पाठविण्याची सूचना केली. सभेत सभासद सुनिल जाधव यांचा सत्कार चेअरमन गिरीश घैसास यांच्या हस्ते झाला, तर ज्येष्ठ सभासद विठ्ठलराव भोरे यांचा ७९ व्या वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ संचालक सुभाष गुंदेचा यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या सभेला संचालक मंडळ सदस्य, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे पदाधिकारी, कायदा व वित्तीय सल्लागार, अधिकारी तसेच मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

# ऋतू माने, सबा पठाण यांची विभागीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड



**अहमदनगर । रयत समाचार**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या वतीने राहुरी येथील लोकनेते रामदास धुमाळ महाविद्यालयात झालेल्या जिल्हास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत श्रीगोंद्यातील दोन विद्यार्थिनींनी उत्तम कामगिरी करत विभागीय स्तरावर प्रवेश मिळवला आहे.

श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयातील कु. सबा फलक मुश्ताक पठाण आणि महादजी शिंदे कनिष्ठ महाविद्यालयातील कु. क्रतु कैलास माने यांनी या स्पर्धेत चमकदार खेळ करत विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. गेल्या महिन्यात महाराजा जीवाजीराव शिंदे महाविद्यालयात झालेल्या प्राथमिक निवड फेरीत श्रीगोंद्यातील १० विद्यार्थिनींची जिल्हा पातळीवरील स्पर्धेसाठी निवड झाली होती. त्यानंतर २७ सप्टेंबर रोजी राहुरी येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत या दोन्ही विद्यार्थिनींनी सर्व फ ेऱ्यांमध्ये कौशल्यपूर्ण खेळ करत आवश्यक गुण मिळवले.

जिल्ह्यातून विभागीय स्पर्धेसाठी पाच विद्यार्थिनींची निवड झाली असून, त्यामध्ये श्रीगोंद्याच्या या दोघींचा समावेश आहे. या यशात प्राचार्या वर्षा भोईटे आणि प्रशिक्षक विठ्ठल होले यांचे मार्गदर्शन लाभले. विशेष म्हणजे कु. सबा फलक पठाण या श्रीगोंद्यातील पत्रकार मुश्ताक पठाण यांच्या कन्या आहेत. या यशाबद्दल माजी मंत्री बबनराव पाचपुते, आमदार विक्रम पाचपुते, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी आमदार राहुल जगताप, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष बाबासाहेब भोस, कुंडलिक दरेकर, सल्लागार समिती सदस्य सुधीर खेडकर, प्राचार्या वर्षा भोईटे, प्राचार्य डी. डी. भुजबळ, पर्यवेक्षक बाळासाहेब शिंदे, शीतल राऊत आदींनी दोन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आहे.

# ‘विशाल गणेश’चा अतिवृष्टीग्रस्तांना मदतीचा हात

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे एक लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द

**अहमदनगर । रयत समाचार**

संपूर्ण महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी, व्यावसायिक व सर्वसामान्य नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत अहिल्यानगरचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश देवस्थान ट्रस्टने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी एक लाख रुपयांचा धनादेश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे सुपूर्द केला. या वेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडित



खरपुडे, सचिव अशोक कानडे, विश्वस्त पांडुरंग नन्नवरे, चंद्रकांत फुलारी, विजय कोथिंबीरे, प्रा. माणिकराव विधाते, नितीन पुंड आदी उपस्थित होते. ॲड. आगरकर म्हणाले की, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. या संकटकाळात समाजातील प्रत्येक घटकाने पुढे येऊन मदतीचा हात द्यावा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून देवस्थान ट्रस्टने या निधीत योगदान दिले आहे. व्यापारी, दानशूर व्यक्ती व नागरिकांनीही या कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. श्री विशाल गणेश देवस्थान ट्रस्टने यापूर्वीही विविध नैसर्गिक आपत्तीच्या काळात मदतकार्य केले असून हा सामाजिक उपक्रम इतर संस्थांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# डॉ. अभय बंग यांचे प्रेरणादायी विचार ऐकण्याची सुवर्णसंधी

## ‘जगावं कशासाठी व कसे?’ विषयावर आरोग्यसदनचा संवाद

**अहमदनगर । रयत समाचार**

मानवी जीवनाला दिशा दाखवणारे आणि ग्रामीण आरोग्य सेवेसाठी आयुष्य वाहिलेल्या पद्मश्री डॉ. अभय बंग यांना प्रत्यक्ष ऐकण्याची दुर्मिळ संधी नगरकरांना उपलब्ध होत आहे. ‘जगावं कशासाठी व कसे?’ या विषयावर त्यांचा संवाद रविवारी ता. ५ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत हॉटेल संजोग, मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आला आहे. डॉ. अभय बंग हे सुप्रसिद्ध वैद्यकीय

AROGYASADAN HOSPITAL
HOME OF HEALTH AND TRUST.

व सामाजिक कार्यकर्ते असून SEARCH (Society for Education And Rural Community Health) या संस्थेचे संस्थापक व संचालक आहेत. ग्रामीण व आदिवासी भागातील आरोग्यसेवा, महिलांच्या आरोग्यविषयक चळवळी, तसेच समाजमनाला भिडणारे संशोधन यासाठी त्यांचे कार्य जागतिक पातळीवर गाजलेले आहे. या संवादाचे आयोजन डॉ. धनंजय वारे (डी.एम. कार्डिओलॉजिस्ट) व डॉ. महेश जरे (डी.एम. कार्डिओलॉजिस्ट) यांनी केले आहे. कार्यक्रमानंतर सर्व सहभागींसाठी स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी हृदयरोग विभाग, आरोग्यसदन हॉस्पिटल, सावेडी, अहिल्यानगर किंवा ९६५७६१३६३५, ८८५५०५०४२१ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे कळविले आहे.

# अतिवृष्टीमुळे विद्यार्थ्यांचे परीक्षा व शैक्षणिक शुल्क माफ करावे; राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

**अहमदनगर । रयत समाचार**

संपूर्ण जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पीक नष्ट झाले असून त्यांना मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. या परिस्थितीत शेतकरी आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणेही कठीण झाले असून, शैक्षणिक खर्च, परीक्षा शुल्क, मासिक भोजनालय खर्च इत्यादी भरणे अवघड झाले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी यांना देऊन अतिवृष्टीमुळे विद्यार्थ्यांचे



परीक्षा व शैक्षणिक शुल्क माफ करावे अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, विद्यापीठांतर्गत शिक्षण घेणाऱ्या अतिवृष्टी भागातील विद्यार्थ्यांचे सर्व परीक्षा शुल्क पुढील वर्षापर्यंत माफ करावे, शैक्षणिक शुल्क आणि वसतीगृह शुल्क माफ करावे तसेच संबंधित शैक्षणिक संस्थांना विद्यार्थ्यांना सहकार्य करण्याचे निर्देश द्यावेत. याशिवाय विद्यार्थ्यांना चालू वर्षातील चार महिन्याकरिता भोजन भत्ता उपलब्ध करून द्यावा, पाण्यामुळे नष्ट झालेल्या शैक्षणिक साहित्याची पुनर्स्थापना करावी आणि अर्जांच्या अंतिम दिनांकात मुदतवाढ केली जावी. निवेदनाच्या प्रसंगी जिल्हाध्यक्ष सुरज मोरे यांच्यासह महेश कांबळे, रोहन शिंदे, सुदर्शन नरोटे, अनिकेत पवार, अजय लाटे, संतोष पवार, अशोक माळशिकारे व मंगेश मोरे उपस्थित होते. निवेदनात इशारा देण्यात आला आहे की, शासन व प्रशासन वरील मागण्या पूर्ण करत नसल्यास जिल्ह्यात सर्वत्र आंदोलन करण्यात येईल आणि होणाऱ्या परिणामास शासन व प्रशासन जबाबदार राहील.

## धार्मिक तेढ नव्हे, सलोखा हवा

# राजकीय स्वार्थासाठी धार्मिक द्वेषाचे राजकारण करू नये- तांबोळी

**अहमदनगर । रयत समाचार**

संतांचा वारसा आणि धार्मिक सलोख्यामुळे प्रसिद्ध असलेले अहिल्यानगर शहर आज धार्मिक तेढीमुळे बदनाम होत असल्याची खंत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष हाजी शौकत तांबोळी यांनी व्यक्त केली. ‘‘शहराचे हे वैभव नष्ट होऊ नये, यासाठी सर्व समाजांनी आत्मपरीक्षण करून एकत्र येणे गरजेचे आहे,’’ असे ते पत्रकार परिषदेत म्हणाले. बारातोटी कारंजा चौकातील रांगोळी प्रकरण, कोठला येथे झालेला रस्ता रोको आणि त्यानंतरचा लाठीचार्ज यांचा उल्लेख करत त्यांनी तीव्र निषेध नोंदविला. ‘‘या अशोभनीय घटनांमुळे व्यापारी व सामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. कित्येक वर्ष शांततेचे प्रतीक असलेले शहर अचानक हिंदू-मुस्लिम वादामुळे चर्चेत येणे ही दुर्दैवी बाब आहे,’’ असे तांबोळी म्हणाले. ‘‘अहिल्यानगरमध्ये प्रायोजित स्वरूपाच्या घटना घडवून धार्मिक सलोखा बिघडविण्याचा प्रयत्न होत आहे. यामागील अदृश्य शक्तींचा शोध घेऊन प्रशासनाने कठोर कारवाई करावी. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही माजी व भावी लोकप्रतिनिधी राजकीय स्वार्थासाठी



समाजात तेढ निर्माण करत आहेत. सोशल मीडिया व फेक आयडीद्वारे भडकावले जात आहे. अशा घटनांवर तातडीने आळा घालणे आवश्यक आहे,’’ असे त्यांनी नमूद केले. धार्मिक भावना भडकविणाऱ्या गुन्ह्यांवर किरकोळ कलमे लावून आरोपींना जामिनावर सोडल्याने जनतेत नाराजी असल्याचे सांगून तांबोळी म्हणाले की, ‘‘वेळेवर कारवाई झाली असती तर आजची परिस्थिती उद्भवली नसती.’’ शहरातील शांततेसाठी मुस्लिम समाज पुढाकार घेत असल्याचे सांगून ते म्हणाले, ‘‘अहिल्यानगरातील सुज्ञ नागरिकांनी एकत्र यावे. शांतता, सलोखा व एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे महाराष्ट्राचे सचिव आमदार रोहित पवार व वरिष्ठ नेते लवकरच सर्व समाज बांधवांना एकत्र करून सलोखा वाढविण्याचे प्रयत्न करणार आहेत.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

STAR HEALTH
आपण कष्टाने कमावलेला पैसा हॉस्पिटल मध्ये बील भरण्यासाठी आहे का ?
CASH COUNTER
* अधिक माहितीसाठी संपर्क *
9049860184, 8208235485

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# नेप्ती सेवा सोसायटी संचालकपदी जपकर बिनविरोध

## ग्रामस्थ व संचालक मंडळाच्या वतीने सत्कार

**नगरतालुका । रयत समाचार**

नगर तालुक्यातील नेप्ती सेवा सोसायटीच्या रिक्त संचालकपदी अंबादास दशरथ जपकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सोसायटीचे तत्कालीन संचालक कै. दशरथ तुकाराम जपकर यांच्या निधनानंतर ही जागा रिक्त झाली होती. त्यांच्या चिरंजीव अंबादास जपकर यांची संचालकपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवड प्रक्रियेसाठी मंदाकिनी ठोकळ यांनी निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. चेअरमन सुरेंद्र होळकर यांनी अंबादास जपकर यांचे नाव सुचविले तर जालिंदर शिंदे यांनी अनुमोदन दिले. विरोधक नसल्याने निवड बिनविरोध जाहीर करण्यात आली.



निवडीनंतर ग्रामस्थ व सोसायटीच्या संचालक मंडळाच्या वतीने अंबादास जपकर यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी माजी सरपंच विठ्ठलराव जपकर, माजी सरपंच संजय जपकर, माजी पंचायत समिती सदस्य देवा होले, शिवाजी होळकर, नितीन कदम, मार्केट कमिटी सदस्य वसंत पवार, सरपंच अशोक जपकर, माजी सरपंच दिलीपराव होळकर, उपसरपंच एकनाथ जपकर, रामदास फुले, माजी उपसरपंच दादू चौगुले, बंडू जपकर, संभाजी गडाख, फारुक सय्यद, बाबासाहेब होळकर, चेअरमन सुरेंद्र होळकर, व्हाईस चेअरमन सादिक पवार, संचालक मच्छिंद्र होळकर, विलास जपकर, दादाभाऊ होळकर, राजाराम जपकर, राजेंद्र जपकर, जालिंदर शिंदे, उमर सय्यद, मुक्ता कांडेकर, रोहिणी होळकर, जमीर सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते.

नवनिर्वाचित अंबादास जपकर म्हणाले की, ''माझे वडील कै. दशरथ तुकाराम जपकर यांनी गावाच्या व शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रामाणिकपणे काम केले. त्यांच्या कार्यपद्धतीवर चालत मी देखील सोसायटीच्या कामात पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि जबाबदारी ठेवून कार्य करणार आहे. शेतकऱ्यांना वेळेवर कर्ज, खत, बियाणे व अन्य सुविधा उपलब्ध करून देणे, व्यवहारात पारदर्शकता ठेवणे आणि नवीन पिढीला रोजगार व मार्गदर्शन मिळावे, यासाठी प्रयत्नशील राहीन.'' या प्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अशोक सावळेराम जपकर यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नागवडे साखर कारखान्याच्या सेवकांचा

# एक दिवसाचा पगार मुख्यमंत्री सहाय्यता निधीस- नागवडे

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**



राज्यातील अतिवृष्टीमुळे अनेक कुटुंबे बेघर झाली असून शेतकरी बांधवांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या संकटग्रस्तांना मदतीचा हात देण्याची सामाजिक बांधिलकी स्वीकारत सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखाना, श्री. छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था, ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्था व श्री. तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान या सर्व संस्थांतील सेवकांचा एक दिवसाचा पगार मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्यात येणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे यांनी दिली. राजेंद्र नागवडे म्हणाले की, यावर्षी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी ढगफुटी होऊन अतिवृष्टी झाली. त्यामुळे नदीकाठच्या व इतर शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेक बांधव बेघर होऊन उघड्यावर आले आहेत. पशुधन संकटात सापडले असून मुलामुलींच्या शिक्षणाची समस्या गंभीर झाली आहे. अशा वेळी सामाजिक जबाबदारी स्वीकारून मदतीला धावणे हीच खरी कर्तव्यभावना असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी कारखान्याचे व्हा. चेअरमन बाबासाहेब भोस, संचालक मंडळ सदस्य, कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. रयत समाचार

# शेतरस्ते हे केवळ मार्ग नसून शेतकऱ्यांच्या जीवनवाहिन्या- कळसे

**नगर तालुका । रयत समाचार**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत मौजे जखनगाव येथील गट क्र. ५५ मधील अनेक वर्षांपासून बंद असलेला शेतरस्ता अखेर खुला करण्यात आला आहे. या रस्त्यातील अडथळे जेसीबीच्या साहाय्याने हटवून मार्ग मुक्त करण्यात आला.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशियांच्या आदेशानुसार, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन ता. १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती ता. ०२ ऑक्टोबर या कालावधीत सेवा पंधरवडा साजरा होत आहे. या उपक्रमाच्या अनुषंगाने हा शेतरस्ता खुला करण्यात आला. या कामासाठी उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील आणि तहसीलदार संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली काम झाले.



## बंद शेतरस्ता पुन्हा खुला

यावेळी मंडळाधिकारी नेप्ती प्रताप कळसे, ग्राम महसूल अधिकारी जखनगाव दिपाली विधाते, ग्राम महसूल अधिकारी हिंगणगाव दीपक झेंडे, सरपंच जखनगाव डॉ. सुनील गंधे, सरपंच हिंगणगाव पोपट ढगे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामदास सोनवणे, उपसरपंच हिंगणगाव अशोक सोनवणे, जेष्ठ नागरिक दादाभाऊ सोनवणे, सुदाम सोनवणे, ॲड. संतोष कांडेकर यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. मंडळाधिकारी प्रताप कळसे म्हणाले, ''आज आपण सर्वांनी एकत्र येऊन अनेक वर्षांपासून बंद असलेला शेतरस्ता खुला केला, ही खरोखरच आनंदाची बाब आहे. शासनाचे आदेश आणि प्रशासनाचे मार्गदर्शन याबरोबरच ग्रामस्थांच्या एकजुटीमुळे हे शक्य झाले आहे. शेतरस्ते हे केवळ मार्ग नसून शेतकऱ्यांच्या जीवनवाहिन्या आहेत. रस्ता खुला झाल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेतीसाठी ये-जा सुलभ झाला असून, कृषी विकासाला चालना मिळेल. भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे शेतकऱ्यांच्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न चालू राहील.''

# शनी देवाचा कारभार पहाणार आता सरकारी अधिकारी

**नेवासा । विजय खंडागळे**

श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथील पूर्वीची विश्वस्त मंडळ शासनाने बरखास्त केली होती. त्यानंतर आता जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या नियंत्रणाखाली देवस्थानचा कारभार पारदर्शक आणि विश्वासार्ह पद्धतीने चालावा यासाठी राज्य शासनाने शनिश्वर देवस्थान कार्यकारी व्यवस्थापन समितीची नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन अधिनियम २०१८ मधील कलम ५ च्या उपकलम १ अन्वये, शासन निर्णय क्रमांक २२२०/प्र.क्र. २९/का.१६ ता. २२ सप्टेंबर २०२५ नुसार करण्यात आली आहे. नियुक्त कार्यकारी समितीत ११ सदस्यांचा समावेश असून मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी (भूमापन विभाग) अतुल चोरमारे यांची निवड करण्यात आली आहे. उपमुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नेवासा तहसीलदार संजय बिराजदार, तर व्यवस्थापक सदस्य म्हणून गटविकास अधिकारी संजय लखवाल यांची नियुक्ती झाली आहे. याशिवाय सदस्य म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष शेळके, सार्वजनिक उपअभियंता विनायक पाटील, मुख्य लेखाधिकारी गणेश खेडकर, उपमुख्य लेखाधिकारी राजकुमार पुंड यांची नियुक्ती झाली आहे.



सदस्य सचिव म्हणून नायब तहसीलदार राजेंद्र वाकचौरे, उपव्यवस्थापक म्हणून मंडळाधिकारी विनायक मोरे, तसेच सदस्य म्हणून तलाठी सतीश पवार आणि ग्रामसेवक दादासाहेब बोरुडे यांचा समावेश करण्यात आला आहे. आता पुढे ही समिती शनिशिंगणापूर देवस्थानचा दैनंदिन कारभार पाहणार असून या नियुक्तीचे सर्वत्र स्वागत व अभिनंदन होत आहे.

रयत समाचार



# लाखो भाविकांच्या उपस्थितीत मोहटादेवी अष्टमी होमहवन, महापूजा संपन्न

**पाथर्डी । नितीन गटाणी**

श्री.क्षेत्र मोहटादेवी येथे शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त अष्टमी होम हवन व महापूजा लाखो भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झाली. रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास पूर्णाहुती झाली. प्रधान जिल्हा न्यायाधीश अंजू शेंडे-सोनटक्के, प्रेमानंद सोनटक्के यांच्या हस्ते होम हवन पूजा, कुमारीका पूजन व पूर्णाहुती सोहळा पार पाडला. गणेश पूजन, मातृकापूजन, नवग्रह पूजन, सप्तशती पाठ अशा धार्मिक विधींच्या माध्यमातून वेद मंत्रोच्चार केला गेला. भाविकांनी अग्नीच्या माध्यमातून देवीस सर्व प्रकारचे अर्पण केले, तसेच तांबूल प्रसाद होम कुंडात अर्पण करण्यात आला. स्त्री शक्तीच्या प्रतीकात्मक पूजनाद्वारे कुमारिका पूजन, सुवासिनी पूजन केले गेले. वेदशास्त्र संपन्न भूषण साखरे, बाळासाहेब शिरसागर, भास्कर देशपांडे, नागेश घायाळ, सुहास रामदासी, भगवान जोशी, महेश झेंड यांनी पौरोहित्य केले, तर संबळ ढोलकी वादक काशिनाथ पवार यांच्या पारंपारिक वाद्याने पूर्णाहुती सोहळा भावपूर्ण बनवला. मोहटा देवस्थान समितीचे अध्यक्ष जिल्हा न्यायाधीश महेश लोणे, पाथर्डीचे दिवाणी न्यायाधीश रविकिरण सपाटे, ॲड कल्याण बडे, ॲड. विक्रम वाडेकर, डॉ. श्रीधर देशमुख, शशिकांत दहिफळे, बाळासाहेब दहिफळे, अक्षय गोसावी, विठ्ठल कुटे यासह मान्यवर उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, मुख्य सेवेकरी अंकुश ठोंबरे आदींनी सर्व कर्मचाऱ्यांसह कार्यक्रमाचे संयोजन केले. आज पावसाने उघडीप दिल्याने तसेच अष्टमी व आठवी माळ असल्याने राज्यभरातून लाखो भाविक उपस्थित होते. अहिल्यानगरमधील अलीकडील जातीय तणावाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा विशेष बंदोबस्त तैनात केला गेला. दसऱ्याच्या दिवशी सायंकाळी सहा वाजता सीमोल्लंघन, शुक्रवारी देवीची यात्रा आणि कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी सोमवारी यात्रोत्सवाची सांगता होईल.

रयत समाचार

# ३०७, १०९ कलमे न लावल्याने माजी सैनिक कुटुंबाचा तीव्र संताप

## एसपींसह जिल्हाधिकारी यांची त्रिदल माजी सैनिक संघटनेने घेतली भेट

**पारनेर । प्रतिनिधी**

तालुक्यातील निघोज येथील माजी सैनिक सत्यवान नारायण लंके (१७ मराठा रेजिमेंट) यांच्यावर गावातील काही गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींनी तीक्ष्ण हत्यार, हॉकी स्टिक, स्टील रॉड व खोऱ्याच्या दांड्याने जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात त्यांचे दोन्ही हात फॅक्चर झाले असून पत्नी सीमा लंके यांच्यावरही हल्ला करून त्यांचा हात फॅक्चर केला. सध्या दोघांवर शिरूर येथील विघ्नहर्ता हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर पारनेर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असला, तरी कलम ३०७ व १०९ सुधारित कलमे न लावल्याने माजी सैनिकांच्या कुटुंबात तीव्र संताप व्यक्त होत आहे.



या प्रकरणात दोन आरोपींना पोलिसांनी अटक करून त्यांचा तीन दिवसांचा एमसीआर घेतला आहे, मात्र दोन अज्ञात आरोपी अजूनही फरार आहेत. त्रिदल माजी सैनिक सेवा संघटना यांच्या वतीने माजी सैनिकांची मुलगी श्रावणी, मुलगा स्वराज लंके तसेच सुरेखा मोरे, विजय लंके, नवनाथ निश्चित, दिलीप शिनोरे, दत्तात्रेय निचित आदींसह जिल्हाधिकारी पंकज आशिया व जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे तक्रार दाखल करून निवेदन सादर करण्यात आले. जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांनी फरार आरोपींना लवकरच अटक करून कठोर कारवाईचे आश्वासन दिले. यावेळी त्रिदल माजी सैनिक सेवा संघटनेचे अध्यक्ष तथा प्रेसिडेंट ॲंटी करप्शन बोर्ड बाळासाहेब आंधळे, त्रिदल महाराष्ट्र राज्य आरोग्य अध्यक्ष युनूस टेगे, सुभेदार तुकाराम जाधवर, सुभेदार अकबर शेख, माजी सैनिक हवाईदल सर्जन लक्ष्मण पालवे, महाराष्ट्र राज्य क्रीडाध्यक्ष हरिभाऊ चिर्के, सैनिक समाज पार्टीचे ॲड. शिवाजी डमाळे आदींसह माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.संघटनेच्या वतीने हल्लाग्रस्त कुटुंबाच्या जीवाला धोका असल्याने त्यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे व फरार आरोपींना तात्काळ अटक करून घटनेत कडक कारवाई करावी, अशी मागणी यावेळी बाळासाहेब आंधळे व माजी सैनिकांनी केली.



# राहुरी विद्यापीठात कांदा उत्पादन खर्चावर विचारमंथन बैठक

**राहुरी । रयत समाचार**

कांद्याच्या उत्पादन खर्चाचा शास्त्रीय अभ्यास करून शासनाला ठोस शिफारसी करण्यात याव्यात, असे राज्य कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी सांगितले. यासाठी राज्य सरकारने नेमलेल्या पाशा पटेल समितीची चौथी बैठक महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे पार पडली. बैठकीत संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, डॉ. बी.टी. पाटील, डॉ. थंगा स्वामी, संजय कदम, सुहास काळे, डॉ. रोहित निरगुडे आणि १५ शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत शेतकऱ्यांनी प्रतिहेक्टरी येणाऱ्या उत्पादन खर्चाची माहिती दिली आणि त्यावर चर्चा झाली. दुबार पेरणी, अतिरिक्त बियाणे, खते व कीटकनाशकांमुळे वाढलेला खर्च कमी करण्यासाठी लागवड यंत्रांची गरज आणि इतर उपाययोजना सुचवण्यात आल्या. बैठकीचे सूत्रसंचालन सुहास काळे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. दत्तात्रय सानप यांनी मानले.

# अगस्ति विद्यालयाने पटकावला पाटणकर स्मृतिचषक

**अकोले । सतीश पाचपुते**

सत्यनिकेतन संस्थेचे संस्थापक सचिव कै. रा.वि. पाटणकर यांच्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित आंतरशालेय तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत श्री अगस्ति एज्युकेशन सोसायटीच्या अगस्ति विद्यालय, अकोलेने आपली चुणूक दाखवत यश संपादन केले.

आठवी ते दहावी या गटात विद्यालयाची विद्यार्थीनी मैत्रेयी निलेश सहाणे हिने प्रथम क्रमांक पटकावला व मानाचा फिरता स्मृतीचषक अगस्ति विद्यालयाच्या नावे केला. आदिवासी भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच सर्वोदय चळवळीतून विविध सामाजिक उपक्रम राबवणे आणि आदिवासी बांधवांच्या हाताला रोजगार मिळवून देणे अशा क्षेत्रांत पाटणकर यांचे महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. त्यांच्या विचारांचा प्रसार व्हावा या उद्देशाने संस्थेच्या वतीने दरवर्षी तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले जाते.



या वर्षीही दोन गटात विद्यार्थ्यांचा मोठ्या संख्येने सहभाग झाला. अगस्ति विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दोन्ही गटात सहभाग घेत यश मिळवले. अर्णव सोनवणे, प्रियदर्शनी भवर आणि साईश्री ढोकरे यांनी स्पर्धेत उत्साहाने भाग घेतला. मोठ्या गटात मैत्रेयी सहाणे हिने प्रभावी वक्तृत्व सादर करून प्रथम क्रमांक पटकावला आणि कै. रा.वि. पाटणकर स्मृतीचषकावर अगस्ति विद्यालयाचे नाव कोरले. यापूर्वीही विद्यालयाने विविध आंतरशालेय स्पर्धांत उल्लेखनीय कामगिरी करून यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या यशाबद्दल संस्थेच्या सेक्रेटरी शैलजा पोखरकर, कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी, प्राचार्य मंगेश खांबेकर, उपमुख्याध्यापक तात्यासाहेब दौंड, पर्यवेक्षक नंदा गोपाळे, शालेय व्यवस्थापन समितीचे गिरीष नवले, सचिन शिंदे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक वर्गाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# भारत मातेचे सुपुत्र लाल बहादूर शास्त्री

भारत मातेचे थोर सुपुत्र, देशाचे दुसरे प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री यांची आज जयंती आहे. लालबहादूर शास्त्री यांचे पूर्ण नाव लालबहादूर शारदाप्रसाद वर्मा असे होते. पण १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी लालबहादूर यांनी मिळवली त्यामुळे त्यांना सर्वजण शास्त्री म्हणू लागले पुढे त्यांनी आपल्या नावापुढे शास्त्री हेच नाव लावले आणि ते लालबहादूर वर्माचे लालबहादूर शास्त्री बनले. त्यांचा जन्म २ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगल सराई या गावात झाला. लालबहादूर शास्त्री दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आईनेच त्यांचा सांभाळ केला. लालबहादूर शास्त्री यांचे बालपण गरिबीतच गेले. घरची हलाखीची परिस्थिती असूनही लालबहादूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय वयातच लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या द सर्व्हन्ट ऑफ द पीपल सोसायटीचे सदस्यत्व त्यांनी घेतले. महात्मा गांधींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. गांधीजींसोबत दांडी यात्रेतही त्यांनी भाग घेतला होता. १९३९ साली त्यांची पंडित नेहरूंशी भेट झाली आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वे व वाहतूक, दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रीपद भूषविले. ते रेल्वेमंत्री असताना एकदा रेल्वेचा अपघात झाला होता त्यात काही प्रवाशांना स्वतःचा जीव गमवावा लागला होता या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी रेल्वेमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. देश आणि संसदेने त्यांच्या या अभूतपूर्व निर्णयाची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनीही त्यांच्या या इनामदार वृत्ती आणि आदर्श मूल्यांची संसदेत प्रशंसा केली होती. पंडित नेहरुंच्या आकस्मिक निधनानंतर देशाची धुरा त्यांच्याकडे आली. ९ जानेवारी १९६४ रोजी देशाचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी आपल्या कर्तुत्ववाने पंतप्रधानपदावर ठसा उमटविला. प्रखर राष्ट्रवादी असलेल्या शास्त्रीजींनी आपल्या पंतप्रधान कालावधीत देशहिताचे अनेक निर्णय घेतले. १९६५ साली पाकिस्तानने आगळीक करुन भारताशी युद्ध पुकारले. पण देशात लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. आपल्या कणखर नेतृत्वाने त्यांनी पाकिस्तानला पराभूत केले. या युद्धानंतर त्यांच्या नेतृत्वाने जगातील मातब्बर नेते प्रभावित झाले. जय जवान, जय किसान या त्यांच्या मंत्राने देश भारावून गेला. लालबहादूर शास्त्री हे अवघे १९ महिने पंतप्रधान होते. या १९ महिन्यांच्या कालावधीत जनसामान्यांच्या हृदयात त्यांनी अढळ स्थान मिळवले. ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. जयंतीदिनी शास्त्रीजींना विनम्र अभिवादन!


**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
**समाजसंवाद**

## मिशन माणुसकी : दैनिक रयत समाचारच्या पूरग्रस्त सहकार्य आवाहनास प्रतिसाद




दैनिक रयत समाचारच्या मिशन माणुसकी या पुरग्रस्त माणसांच्या सहकार्यासाठी हाकेला ''ओ'' देऊन किराणा सामान देणाऱ्या व्यक्ती. १) ह.भ.प.अजयमहाराज बारस्कर, २) विष्णु भुतकर, निशांत झोपडी कँटिन, ३) अभिजित अनाप, पुणे, ४) दत्ताभाऊ वडवणीकर, ५) इंजि. प्रशांत पाटील (दीनमित्रकार मुकूंदराव पाटील यांचे नातू) ६) संजय वाघ, फोटो कॉर्नर.

# छत्रपतींच्या विचारांनी प्रेरित पतसंस्थेची यशस्वी वाटचाल



**नगर । रयत समाचार**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यपद्धतीवर प्रेरणा घेऊन मराठा सेवा संघ आणि अहिल्यानगर जिल्हा मराठा नागरी सहकारी पतसंस्थेचीवाटचाल अभिमानास्पद आहे, असे गौरवोद्गार आमदार संग्राम जगताप यांनी काढले. पतसंस्थेच्या रोप्य महोत्सवानिमित्त आयोजित जीवनगौरव आणि गुणगौरव पुरस्कार वितरण सोहळा गुलमोहर रोडवरील कोहिनूर मंगल कार्यालयात थाटामाटात पार पडला.

या सोहळ्यात राष्ट्रपती पदक विजेते सोमनाथ कळसकर गुरुजी, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष डॉ. विमलताई ढेरे, उद्योजक संजय चव्हाण, राजेंद्र उदागे आणि बालघर प्रकल्पाचे संस्थापक युवराज गुंड यांना निवृत्त आयएएस अधिकारी पुरुषोत्तम भापकर, इंजि. डॉ. विजयकुमार ठुबे आणि अन्य मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. आ. संग्राम जगताप यांनी आपल्या भाषणात सांगितले की, मराठा सेवा संघ आणि पतसंस्था समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असून, समाजातील विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्तींना गौरविणे ही प्रेरणादायी बाब आहे. त्यांनी समाज भवनासाठी शासनाकडून मिळालेल्या जागेवर निधी उपलब्ध करून दिला असून, प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. निवृत्त आयएएस पुरुषोत्तम भापकर यांनी सांगितले की, पतसंस्था तळागाळातील बांधवांना आर्थिक बळ देण्यासाठी कार्यरत आहे. मराठा सेवा संघ समाजातील अडचणी सोडवण्यासाठी पुढाकार घेत आहे. गेल्या २५ वर्षांपासून पतसंस्था सातत्याने गौरव सोहळा आयोजित करत असून, अध्यक्ष इंजि. डॉ. विजयकुमार ठुबे यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने विविध क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. अध्यक्ष इंजि. डॉ. विजयकुमार ठुबे यांनी सांगितले की, पतसंस्था २५ व्या वर्षात पदार्पण करत असून, समाजाचा विश्वास संपादन करत ५५ कोटींच्या ठेवींचा टप्पा गाठला आहे. लवकरच हा आकडा १०० कोटींवर नेण्याचा मानस असून, समाज यासाठी निश्चितपणे पुढे येईल. दरवर्षी आयोजित पुरस्कार सोहळ्यांमधून समाजातील कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळते आणि त्यांचे कार्य समाजासमोर येते. कार्यक्रमात दैनिक युवा भारतचे संपादक किसनराव हासे, संचालक किशोर मरकड, डॉ. कल्पना ठुबे, स्वाती जाधव, नंदिनी सोनाळे, राजेश परकाळे, उदय अनुभुळे, ऍड. राजश्री शितोळे, प्रा. किसन पायमोडे, कालिदास शिंदे, डॉ. काशिनाथ डोंगरे, इंजि. संभाजी मते, द्वारकाधीश राजे भोसले, इंजि. बाळासाहेब सोनाळे, राजेश कावरे, निवृत्ती रोहकले, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक वारकड आदी मान्यवर उपस्थित होते. रोप्य महोत्सवानिमित्त पतसंस्थेच्या नव्या वेबसाईटचे प्रकाशन आणि जिजाऊ माँ साहेबांच्या प्रतिमेसह चांदीच्या नाण्याचे अनावरण पुरुषोत्तम भापकर आणि संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. कल्पना ठुबे यांच्या जिजाऊ वंदना गायनाने झाली. यावेळी दिवंगत व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. स्वागत व्हा. चेअरमन बाळकृष्ण काळे यांनी, प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष इंजि. सुरेश इथापे यांनी तर आभार किशोर मरकड यांनी मानले. सूत्रसंचालन प्रतीक्षा सोनवणे यांनी केले. कार्यक्रमानंतर अहिल्यानगर जिल्हा मराठा पतसंस्थेची वार्षिक सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

# जखणगावमधील बंद शेतरस्ता पुन्हा खुला

## सेवा पंधरवड्यात प्रशासन आणि ग्रामस्थांचा संयुक्त उपक्रम

**नगर । रयत समाचार**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत मौजे जखनगाव (ता. नगर) येथील गट क्र. ५५ मधील अनेक वर्षांपासून बंद असलेला शेतरस्ता अखेर खुला झाला आहे. या शेतरस्त्यातील अडथळे जेसीबीच्या सहाय्याने हटवून मार्ग मुक्त करण्यात आला. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या आदेशानुसार, राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिन (दि. १७ सप्टेंबर) ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती (दि. २ ऑक्टोबर) या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवडा साजरा केला जात आहे. याच उपक्रमाचा भाग म्हणून हा शेतरस्ता खुला करण्यात आला. या कामासाठी उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. मंडळाधिकारी प्रताप कळसे, ग्राम महसूल अधिकारी जखनगाव दिपाली विधाते, ग्राम महसूल अधिकारी हिंगणगाव दीपक झेंडे, सरपंच डॉ. सुनील गंधे, पोपटराव ढगे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामदास सोनवणे, उपसरपंच अशोक सोनवणे, जेष्ठ नागरिक दादाभाऊ सोनवणे, सुदाम सोनवणे, ॲड. संतोष कांडेकर यांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. मंडळाधिकारी प्रताप कळसे म्हणाले, ''शेतरस्ते केवळ मार्ग नाहीत, तर शेतकऱ्यांच्या जीवनवाहिन्या आहेत. रस्ता बंद राहिल्याने शेतीला वाव मिळत नाही, उत्पादन बाजारापर्यंत पोहोचणे कठीण होते आणि विकासाला अडथळा निर्माण होतो. आज प्रशासन आणि ग्रामस्थांच्या एकजुटीमुळे रस्ता खुला झाला आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना शेतीकामांसाठी सुलभ मार्ग मिळाला आहे. या पुढेही गावोगाव असे उपक्रम राबवून शेतकऱ्यांच्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न राहील. ग्रामस्थांनी प्रशासनाला नेहमी सहकार्य करावे, अशी आमची अपेक्षा आहे.''



# आनंद पार्श्व गुरुकुल नेत्र तपासणी शिबिर संपन्न

## १४० विद्यार्थ्यांनी घेतला लाभ

**अहमदनगर । पंकज गुंदेचा**

श्री आनंद पार्श्व गुरुकुल येथे आनंद नवकार परिवार ट्रस्ट, महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषी म. सा. व संस्कार प्रेमी प. पू. आलोकऋषी म. सा. यांच्या आशीर्वादाने, तसेच डॉ. सुधा प्रकाश कांकरिया व साई सूर्या नेत्र सेवा यांच्या सहकार्याने शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत नेत्र तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले.

सध्याच्या डिजिटल युगात विद्यार्थी मोबाईल, कॉम्प्युटर आणि टीव्हीचा मोठ्या प्रमाणावर वापर करत असल्यामुळे डोळ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हे शिबिर अत्यंत महत्त्वाचे ठरले. ता. २५ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १२.३० या वेळेत घेतलेल्या या शिबिराचा लाभ सुमारे १४० विद्यार्थ्यांनी घेतला. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्या कादंबरी सूर्यवंशी, मेघा बोरा व साई सूर्या नेत्र तपासणी डॉक्टरांची टीम उपस्थित होती. डॉक्टरांच्या वैद्यकीय पथकाने विद्यार्थ्यांची दृष्टी तपासणी (Vision Test), रिफ्रॅक्शन एरर (Refraction Error) निदान व डोळ्यांच्या सामान्य समस्यांबाबत मार्गदर्शन केले.

ज्या विद्यार्थ्यांना चष्म्याची गरज असल्याचे निदान झाले, त्यांची नोंद घेऊन त्यांना सवलतीच्या दरात किंवा मोफत चष्मा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देण्यात आले. या वेळी शरद टिमकरे यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली व आयोजक व वैद्यकीय पथकाचे आभार मानले. आरोग्य पथकाने विद्यार्थ्यांना डोळ्यांची काळजी घेण्याचे उपाय, डिजिटल स्क्रीन वापरताना घ्यावयाची दक्षता व योग्य आहाराविषयी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे पालकांनी समाधान व्यक्त केले तसेच शाळेच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. श्री आनंद पार्श्व गुरुकुलने अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे भविष्यातही आयोजन करणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# केडगावसह अहिल्यानगरमधील कचऱ्याचा प्रश्न गंभीर

**अहमदनगर । रयत समाचार**

केडगाव उपनगरात गेल्या काही महिन्यांपासून कचरा संकलनाची घंटागाडी सेवा बंद असल्याने रस्त्यावर कचऱ्याचे ढीग साचले असून सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात भाविकांची गर्दी लक्षात घेता परिसरात तात्पुरत्या स्टॉल्स आणि खाद्यपदार्थ विक्रीची ठिकाणे उभारल्यामुळे कचरा प्रचंड प्रमाणात साचत आहे. यामुळे शाळकरी मुलांपासून वृद्धांपर्यंत नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून साथीचे आजार पसरण्याचा धोका वाढला आहे. स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर यांनी मनपा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांना निवेदन सादर करून तातडीने घराघरात घंटागाडी सेवा सुरू करण्याची मागणी केली.



मनपा आयुक्तांनी यावर प्रतिक्रिया देताना सांगितले की, १५ दिवसांत नवीन ठेकेदार नेमून नियमित कचरा संकलन पुन्हा सुरू केले जाईल. मनोज कोतकर यांनी प्रशासनाला फक्त आश्वासन न देता, तातडीने कचरा हटवून स्वच्छता कायम राखण्याचे ठोस पावले उचलण्याचे आवाहन केले.



# वसतिगृहातील विद्यार्थ्यांना नवरात्र फराळ; विघ्नहर्ता प्रतिष्ठानचा उपक्रम

**अहमदनगर । रयत समाचार**

सावेडी टीव्ही सेंटर चौकातील विघ्नहर्ता प्रतिष्ठान तर्फे नवरात्र उत्सवानिमित्त विविध उपक्रम राबविले जात असून, त्या अनुषंगाने रामकरण सारडा विद्यार्थी वसतिगृहात खास फराळाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शिक्षणासाठी पालकांपासून दूर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना आपलेपणाचा स्पर्श मिळावा या उद्देशाने हा उपक्रम पार पडला. कार्यक्रमास प्रतिष्ठानचे अध्यक्ष योगेश सोनवणे, नितीन तनपुरे, सुनील डहाळे, श्रीकांत भालके, पिनू मस्के, सचिन महाजन, अजय कारला, वरद सोनवणे यांच्यासह वसतिगृहातील विद्यार्थी, कार्यकर्ते व मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना योगेश सोनवणे म्हणाले, नवरात्रात माता भगवतीचे व्रत पाळताना विद्यार्थ्यांनाही पालकत्वाचा स्पर्श मिळावा, या हेतूने आम्ही हा फराळ सोहळा घेतला. मुलांना येथेही आपल्या पालकांसारखे कोणी आहे ही भावना देणे हाच आमचा उद्देश आहे. कार्यक्रमादरम्यान सर्व विद्यार्थ्यांना साबुदाणा खिचडी, फळे, चिक्की, खजूर यांचा फराळ देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची लकेर उमटताच हा उपक्रम खऱ्या अर्थाने यशस्वी ठरला.

# रेणुकामाता देवस्थानचे व्यवस्थापन कौतुकास्पद– उपधर्मादाय आयुक्त जगताप

**अहमदनगर । रयत समाचार**

शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थान येथे उपधर्मादाय आयुक्त एन.व्ही. जगताप आणि ॲड. राजेंद्र वाबळे यांनी भेट देऊन देवीचे दर्शन घेतले. यावेळी देवस्थान ट्रस्टच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. प्रारंभी उपधर्मादाय आयुक्त जगताप यांच्या हस्ते देवीची आरती करण्यात आली. या प्रसंगी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, तसेच विश्वस्त राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे, सचिन कोतकर आदी मान्यवर उपस्थित होते. उपधर्मादाय आयुक्त एन.व्ही. जगताप यांनी सांगितले की, श्री रेणुका माता मंदिर हे एमआयडीसी पंचक्रोशीतील श्रद्धेचे केंद्रस्थान आहे.



नवरात्रोत्सवाच्या काळात येथे येऊन देवीचे दर्शन घेणे ही मोठी आध्यात्मिक अनुभूती आहे. मंदिर परिसरात भाविकांची गर्दी वाढते, त्यावेळी व्यवस्थापनाची जबाबदारी महत्त्वाची ठरते. देवस्थान ट्रस्टने केलेली तयारी आणि भाविकांच्या सोयीसाठी घेतलेली काळजी कौतुकास्पद आहे. श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही शारदीय नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असून, मंदिर परिसर भाविकांच्या गर्दीने फुलून गेला आहे. शहरासह पंचक्रोशीतील हजारो भाविक देवीच्या दर्शनासाठी येत आहेत.



